# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery Of Stolen Property**

**Police Station** :- **Malegaon**

**Date of Good Work done** :- **12/04/2022**

**Brief of the work done :-**

पो. स्टे. मालेगाव हद्दीतील अंजनकार ज्वेलर्सच्या मालकावर सशस्त्र हल्ला करून लुट्रून नेलेला मुद्देमाल '128 ग्रॅम सोने' अंदाजे 6 लाख रुपयांचा मुद्देमाल मूळ मालकास परत करण्यात आला आहे.

लोकमत

## दरोड्यातील सहा लाखांचा मुद्देमाल मूळ मालकास परत!



**वाशिम :** मालेगाव शहरातील अंजनकर ज्वेलर्सच्या मालकाला अडवून लुटून नेलेला सहा लाखांचा मुद्देमाल दरोडेखोरांकडून हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले आहे. हा मुद्देमाल मूळ मालक योगेश अंजनकर यांना ११ एप्रिलला पोलीस अधीक्षक बच्चन सिंह यांच्या हस्ते परत देण्यात आला.

२१ डिसेंबर २०२१ रोजी रात्री ९ वाजताचे दरम्यान मालेगाव शहरात अंजनकर ज्वेलर्सचे मालक योगेश गजानन अंजनकर हे त्यांचा कारागीर रवींद्र वाळेकर यांच्यासह दुकानातील ९ लाखांचा मुद्देमाल घेऊन मोटारसायकलने घरी जात असताना अज्ञात दरोडेखोरांनी त्यांची मोटारसायकल अडवून मुद्देमाल लंपास केला होता. पोलीस स्टेशन मालेगाव व स्थानिक गुन्हे शाखा वाशिम येथील अधिकारी व पोलीस अंमलदारांनी ४८ तासांच्या आत हा गुन्हा उघडकीस आणून एकूण ५ आरोपींना ताब्यात घेतले. आरोपींकडून गुन्ह्यातील चोरलेल्या सोन्यापैकी एकूण १२८ ग्रॅम सोने हस्तगत करण्यात आले. विद्यमान न्यायालयाच्या आदेशाने ११ एप्रिलला पोलीस अधीक्षक बच्चन सिंह यांचे हस्ते योगेश गजानन जनकर यांना सहा लाखांचा मुद्देमाल परत करण्यात आला. यावेळी मालेगाव पोलीस स्टेशनचे ठाणेदार किरण वानखडे व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सोमनाथ जाधव उपस्थित होते.

Hello Washim
Page No. 1 Apr 12, 2022
Powered by: erelego.com